सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक २७५ ▪ गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-275 ▪ Thursday 12 February, 2026 ▪ Postal Date 13 February, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी; दोघे ताब्यात

नेकनूर (किसान न्युज): जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कारवायांचे सत्र सुरु असताना नेकनूर पोलिसांनी गांज्याची तस्करीचे रॅकेट उघडकीस केले आहे.सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी एका शेतात छापा मारून याचा फर्दाफ़ाश केला.या कारवाईत ११ किलो १५० ग्रॅम गांजा ज्याची किंमत २ लाख ७८ हजार ७५० रुपयांच्या घरात असल्याची माहिती आहे.नेकनूर पोलिसांनी यावेळी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केले. नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगणी बुद्रुक गावात एका उसाच्या शेतात सिमेंटच्या गोणीत गांज्या भरून ठेवण्यात आला होता.याची माहिती नेकनूर पोलिसांना झाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी व त्यांच्या टीमने छापा मारला.यावेळी शेतात दोन सिमेंटच्या गोणीत ११ किलो १५० ग्रॅम गांज्या पोलिसांना सापडला.या गांज्याची तस्करी होणार असतानाच पोलिसांनी गुमानसिंग शिवराम पावरा (वय-३५,रा.बोरमल्ली पाडा,ता.शिरपूर,जि.धुळे) व मनोज सीताराम मेहता (वय१९,रा.बाखरली, » पान २ वर

## — काल रात्री सावरगाव घाटातून ११० अनाधिकृत हायवा भरून नेले —

# कलेक्टरांना कोणत्या मंत्र्यांचा फोन आला का? चार दिवस बंद असलेला वाळू घाट पुन्हा काल रात्री पासून सुरू झाला

### टोलनाक्याच्या पलीकडे चालवा कॅमेऱ्यात दिसू नका म्हणून महसूल च्या कोणत्या अधिकाऱ्याने दिला संदेश

### कलेक्टर साहेब हे बघा आज सकाळ चे फोटो

बीड । किसान न्युज

**वाळू चोरीचा शिक्का बसल्याने मागील पाच दिवसांपासून बंद असलेला गेवराई तालुक्यातील सावरगाव वाळू घाट काल बुधवार (दि.११) सायंकाळपासून जोमाने सुरू झाला आहे. या चालू होण्यामागे राजकीय वरदहस्त असल्याची चर्चा सुरू झाली आहे. तर मोठ्याप्रमाणात यंत्रणा लावून कंत्राटदाराने वारेमाप उपसा करुन एका रात्रीत १०० पेक्षा जास्त टिप्पर एका रात्रीत भरुन दिले असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. ही वाळू वाहतूक टोलनाका चुकवून झाल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. पण याकडे महसूलचे दुर्लक्ष असून, ते झोपेचं सोंग घेत असून यामागे कारण काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

कोल्हापूरच्या पावत्या देऊन वाळू घाट कंत्राटदाराने टिप्पर धारकांशी हातमिळवणी करुन मोठ्या प्रमाणात वाळू चोरुन विक्री केली आहे. हा प्रकार टिप्पर धारकांमुळेच उघडकीस आला. याची कलेक्टर यांनी गंभीर दखल घेऊन ७८ टिप्पर धारकांना तब्बल ७ कोटी ९२ लाखांचा तर वाळू घाट कंत्राटदाराला ७ कोटीचा दंड ठोठावला आहे. या नोटीस संबंधितांना पाठविल्याचे सांगितले जात आहे. त्याचा अद्याप खुलासा काय आला याची माहिती मिळू शकली नाही. परंतु कलेक्टर यांचे लक्ष असल्याने कंत्राटदाराने वाळू घाटावर असलेली सर्व यंत्रणा रातोरात हलवली होती. यामुळे येथील वाळू उपसा जवळपास मागील पाच दिवसांपासून बंद होता. मात्र या कंत्राटदाराच्या डोक्यावर राजकीय हात असल्याने या वरदहस्तामुळे पुन्हा वाळू घाट बुधवार (दि.११) सायंकाळपासून जोमाने सुरू झाला आहे. येथे कंत्राटदाराने मोठी यंत्रणा लावून एका रात्रीत बेसुमार वाळू उपसा करुन तब्बल १०० पेक्षा जास्त टिप्पर भरुन दिले आहेत. या सर्व टिप्पर चालकांकडून टोलनाका चुकवून वाळू वाहतूक केली असल्याचे सांगितले जात आहे. एका रात्रीत इतक्या मोठ्या प्रमाणात वाळू उपसा झाल्याने कंत्राटदाराने शासनाचे ठरवून दिलेल्या नियमांना चक्क केराची टोपली दाखवली असल्याची चर्चा आहे. इतकी मोठी डेअरिंग कोणीही राजकीय वरदहस्ताशिवाय करुच शकत नाही. यामुळे पर्यावरण व इतर नियम कायदे, काणून केवळ सामान्यांसाठी असून, यामुळे २२ टेंडरच्या लिलावाची दोन-तीन वेळा जाहिरात काढून ही कोणी टेंडर भरत नाही. यामागे केवळ प्रशासनाचा ससेमिरा हे कारण असल्याची चर्चा आहे. काही वेळा काही मोठ्यांना मोकळे रान मिळावे म्हणून ही दुसरे वाळू घाट सुरू होऊ नये आणि सामान्यांना आपल्यालाच लुटता यावे म्हणून टेंडर भरणाऱ्यांवर दबाव टाकला जात आहे का? असा संशय व्यक्त केला जात आहे. यामुळे महसूल प्रशासनाने याचा विचार करुन गोरगरिबांच्या घरांचे स्वप्न साकार व्हावेत याचा विचार करुन निर्णय घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### रामटेकवर भेट अन् वाळू घाट सुरू?

**गेवराई तालुक्यातील सावरगाव येथील वाळू घाट कंत्राटदार आणि गेवराईतील राजकीय व्यक्तींशी जवळचे हितसंबंध जुळलेले असून, तीन दिवसांपूर्वीच रामटेकला भेट घेतली. ही भेट जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या संदर्भात होती असे बातम्या मधून सांण्यात आले आहे. पण या भेटीच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे बुधवारी सायंकाळी सावरगाव वाळू घाट सुरू झाला. येथे पहिल्यापेक्षा दुप्पट यंत्रणा लावली गेली आणि रात्रभर वाळू उपसा करण्यात आला. तो आज सकाळी १० पर्यंत सुरू होता. यामुळे वाळू कंत्राटदाराला कोणाचीही भीती नाही असे दिसत असून, वाळू घाट सुरू झाल्याने रामटेक भेटीचा अन् वाळू घाट सुरू होण्याचा काही संबंध आहे का? अशी चर्चा सुरू झाली आहे.**

### २५ केन्या अन् दोन पोकलेन लावून वाळू उपसा

**वाळू घाटावर यंत्रा ऐवजी माणसं लावून उपसा करण्याचा नियम आहे. काही कारणास्तव यंत्र लावली तरी त्याची संबंधित जबाबदार महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन नोंद घेणे तसेच वाळू उपसा किती झाला याची नोंद घेणे आवश्यक आहे. त्यासाठी परवानगी आवश्यक आहे. पण सावरगाव वाळू घाटावर याची सरळ पायमल्ली होताना दिसत आहे. येथे काल सायंकाळपासून तब्बल २५ केन्या आणि दोन पोकलेन लावून रात्रभर बेसुमार वाळू उपसा सुरू आहे. या यंत्राद्वारे वाळू उपसा करुन रातोरात टिप्पर भरुन दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.**






# आज डीपीडीसीची बैठक पडली पार

### पालकमंत्री सुनेत्रा पवार व्हिसीद्वारे उपस्थित

### आ.धनंजय मुंडे यांनी केल्या प्रमुख मागण्या

बीड । किसान न्युज

जिल्हा नियोजन समितीची आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन सभागृहात बैठक पार पडली. यावेळी आ. धनंजय मुंडे यांनी जिल्ह्यातील अनेक म्हत्वाच्या मागण्या केल्या आहेत. तसेच या बैठकीची सुरुवात अजितदादा यांना श्रद्धांजली अर्पण करुन करण्यात आली. या बैठकीसाठी पालकमंत्री सुनेत्रा पवार या व्हिसी द्वारे सहभागी झाल्या होत्या. बीड जिल्ह्यातील प्रलंबित विकास कामे यांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे आज गुरुवारी (दि.१२) सकाळी आयोजित करण्यात आली होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. धनंजय मुंडे यांनी प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग परळी वैद्यनाथ येथे प्रत्येक वर्षी महाशिवरात्री निमित्त यात्रा, जत्रा,



पशु - पक्षी प्रदर्शन यांसह विविध आयोजनासाठी विशेष बाब म्हणून प्रतिवर्षी ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी, आगामी आर्थिक वर्षात ग्राम पंचायतींना जनसुविधा विशेष अनुदान या लेखाशीर्ष मधील निधी » पान २ वर

# संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह बांधकामासाठी निधीसह मंजूरी

### आ.संदिप क्षीरसागरांनी मानले स्व.अजितदादा पवार आणि महाराष्ट्र शासनाचे आभार

**ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी स्वतंत्र, हक्काचे वसतीगृह होणार**

बीड । किसान न्युज

ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतीगृह होणार हा निर्णय संपुर्ण बीड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक झाला आहे. संत भगवानबाबा शासकीय वसतीगृहाच्या बांधकामासाठी शासनाकडून भरघोस निधीसह मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आ.संदिप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते स्व.अजितदादा पवार



तसेच महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत. मागील मोठ्या कालावधीपासून बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार या नात्याने बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत ऊसतोड कामगारांची मोठी संख्या लक्षात घेवून त्यांच्या मुला-मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि हक्काचे शासकीय वसतीगृह उभारण्यात यावे या करीता आ.संदिप क्षीरसागरांचा पाठपुरावा सुरू होता. संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना प्रभावीपणे राबवून ऊसतोड कामगारांच्या » पान २ वर

## भारत बंद निमित्त बीड मध्ये जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने




बीड । किसान न्युज

आज देशभारतील कामगार संघटना, बँक कर्मचारी आणि शेतकरी संघटनांनी भारत बंदची हाक दिली आहे. या निमित्ताने बीड शहरात विविध कामगार व शेतकरी संघटनांनी जिल्हाधीकारी कार्यालयासमोर आंदोलन करत आपला सहभाग नोंदवला. भारत-अमेरिकेतली व्यापार सरकारच्या नवीन धोरणांचा या संघटनांनी विरोध केला आहे. भारत बंदमध्ये १० केंद्रीय ट्रेड युनियनचा समावेश आहे. यामध्ये आय एन टी यू सी, एच एम एस सी, टू ए आय यू ,टी यू सी टी यू ,सी सी , » पान २ वर

## जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणारे गेवराईतील नाथ फाउंडेशन क्लासेस

गेवराई । किसान न्युज

शहरातील ताकडगाव रोड येथील नाथ फाउंडेशन क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करून गेवराईसह संपूर्ण बीड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन (SOF) आयोजित NSO (National Science Olympiad) च्या सेकंड लेव्हलसाठी तब्बल २५ विद्यार्थी पात्र ठरले असून IMO (International Mathematics Olympiad) च्या सेकंड लेव्हलसाठी २४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. हा उल्लेखनीय निकाल गेवराई तालुक्यासाठी अभिमानास्पद ठरत आहे. तसेच शालेय स्तरावर अत्यंत कठीण समजली जाणारी डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा » पान २ वर

# हिवताप कार्यालयात 'वडझरी पॅटर्न'

### आठ दिवसांत चार आरोग्य सेवकांच्या ऑर्डर शिंदे-सानप यांच्या नातेवाईकांना लाभ?

बीड । शेख अय्युब

जिल्हा हिवताप (मलेरिया) कार्यालयात पुन्हा एकदा तथाकथित 'वडझरी पॅटर्न' सक्रिय झाल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. गेल्या आठ दिवसांत आरोग्य सेवक पदाच्या चार नियुक्ती आदेश (ऑर्डर) देण्यात आल्याची माहिती समोर आली असून, त्यापैकी दोन आदेश हे संबंधित अधिकाऱ्यांच्या निकटवर्तीयांना देण्यात आल्याचा गंभीर आरोप विश्वसनीय सूत्रांकडून केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा हिवताप कार्यालयातून अल्पावधीतच चार जणांना आरोग्य सेवक पदासाठी नियुक्ती आदेश देण्यात आले. मात्र या प्रक्रियेबाबत कोणतीही पारदर्शक माहिती अधिकृत संकेतस्थळावर अथवा सार्वजनिक नोटीसद्वारे जाहीर करण्यात आली नसल्याने शंका अधिक गडद झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, दिलेल्या चार आदेशांपैकी एक आदेश जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शिंदे यांच्या पाहुण्याला देण्यात आला असल्याची चर्चा आहे, तर दुसरा आदेश आरोग्य कर्मचारी सानप यांच्या जवळच्या नातेवाईकाला मिळाल्याचे सांगितले जात आहे. या दोन्ही » पान २ वर

## परळीत ऐतिहासिक महापशूधन

# उद्या ना.पंकजाताईंच्या हस्ते एक्स्पोचे उद्घाटन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १५ ऐवजी १४ तारखेला येणार



### पशू प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात; एक हजाराहून अधिक विविध पशूंचा सहभाग

परळी वै. । किसान न्युज

प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ऐतिहासिक व भव्य असे राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन एक्स्पो पहिल्यांदाच भरत आहे. या पशू प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवार १४ तारखेला परळीत येणार आहेत. शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील ओपळे मैदानात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान 'अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे' भव्य आयोजन » पान २ वर

# बीड जिल्हा रुग्णालयाला अजितदादांचे नाव द्यावे

### दादांच्या कर्तृत्वाला साजेल अशी तय्यब भाईंची मागणी

बीड । किसान न्युज

राज्याचे कार्यसम्राट अशी ओळख असलेले तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांचे बीड जिल्हा रुग्णालयाला नाव देण्यात यावे अशी मागणी संपादक तथा मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ही त्यांची मागणी अत्यंत रास्त आणि योग्य असून अजित पवार यांच्या कार्याला साजेल अशी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. अजित पवार हे राज्याच्या विकासाची स्वप्ने घेऊन सुर्य उगण्याआधी आपल्या कामाला सुरुवात » पान २ वर



# तेजस अर्बनकडून धान्य तारण योजना सुरू

### १६ टक्के व्याजदरात कर्ज; अध्यक्ष प्रकाश कवठेकर यांच्या नेतृत्वाखाली नवी योजना

बीड । किसान न्युज

शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, बीड या संस्थेच्या वतीने धान्य तारण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना व सभासदांना त्यांच्या धान्यावर तारण ठेवून १६ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ही संस्था २०१६ पासून सातत्याने कार्यरत असून, अल्पावधीतच संस्थेने सभासदांच्या विश्वासावर भक्कम उभारणी केली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, छोटे व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक आधार देण्यासाठी संस्था विविध योजना प्रभावीपणे राबवत आहे. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश दादा कवठेकर यांच्या » पान २ वर



स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंपळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 161,000
२२ कॅरेट 155,000
चांदी प्रतिकिलो 275,000